# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 14 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- हवामान विभागाचे अंदाज जितके जास्त अचूक तितकंच त्यांच्या माहितीचं महत्त्व अधिक – पंतप्रधानांचं प्रतिपादन
- पानिपत स्मारकासाठी महाराष्ट्र सरकार आवश्यक भूसंपादन करणार–मुख्यमंत्र्यांची घोषणा
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार विविध कार्यक्रमांनी साजरा

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथल्या पाणचक्की तसंच दरवाजांचे चित्र असलेल्या टपाल तिकीटांचं प्रकाशन

****

आता सविस्तर बातम्या

****

हवामान विभागाचे अंदाज जितके जास्त अचूक होत जातील, तितकंच त्यांच्या माहितीचं महत्त्व वाढेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतीय हवामान विभागाच्या दिडशेव्या स्थापना दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम इथं मिशन मौसमचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. हवामानाच्या क्षेत्रात अधिक संशोधनाची गरज व्यक्त करताना पंतप्रधान म्हणाले –

***साथियों, आज समय है हम इस दिशा मे और ज्यादा रिसर्च करें जो विनाम प्रामाणिक हो उसे आधुनिक सायंस से लिंक करने के तरीकों***

***को तलाशें. साथियों, मौसम विभाग के अनुमाण जितने ज्यादा सटीक होते जायेंगे उसकी सुचनाओं का महत्व बढता जायेगा. आनेवाले समय मे आयएमडी के डेटा की मांग बढेगी, विभिन्न सेक्टर्स इंडस्ट्री यहां तक के सामान्य मानवी के जीवन मे इस डेटा की उपयोगिता बढेगी! इस लिये हमें भविष्य की ज़रूरतों को ध्यान मे रख्ते हुये काम करना है.***

हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या आयएमडी व्हिजन – २०४७ चं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. त्यात हवामानाचा अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामान बदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे.

****

दरम्यान, पंतप्रधान उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. मुंबई इथं नौदलातील आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत परीक्षेवरील चर्चा कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी यावर्षी सव्वा तीन कोटी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी नोंदणी करत विक्रम मोडला आहे. नोंदणीमध्ये परदेशी विद्यार्थ्यांचाही समावेश आहे, परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाची ही ८ वी आवृत्ती शालेय स्तरावर आयोजित केली जात आहे, यासाठीची नोंदणी २३ जानेवारीपर्यंत करता येणार आहे.

****

सूर्याचा मकर राशीत प्रवेश तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण आज साजरा होत आहे. या दिवशी परस्परांना तीळगुळ वाटपाचा तसंच महिलावर्गात सौभाग्यदानासह मातीच्या सुगड्यांमधून विविध वस्तूंचं वाण देण्याचा प्रघात आहे. दक्षिण भारतात पोंगल तर ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

इसवीसन १७६१ साली आजच्या दिवशी हरियाणात पानिपत इथं मराठ्यांनी गाजवलेल्या शौर्याचं स्मरणही आज केलं जातं. या निमित्त पानिपत इथं होत असलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. या लढाईचं स्मारक उभारण्यासाठी आवश्यक भूसंपादन महाराष्ट्र राज्य सरकार करेल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली, ते म्हणाले –

> ***आज ये आश्वासित करना चाहता हूं, आनेवाले दशकों दशकों तक यहां पर कार्यक्रम आयोजित करने के लिये केवल शौर्य स्मारक ट्रस्ट नही होगा। महाराष्ट्र की सरकार ही आपके साथ में इस कार्यक्रम का आयोजन करेगी। और यहां पर जिस जमीन का अधीग्रहण करना है, इस स्मारक के विस्तार के लिये इसका अधिग्रहण महाराष्ट्र की सरकार पैसे देकर करेगी।***

****

मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात आज अमृत स्नान सोहळा साजरा झाला. आज पहाटेपासून विविध १३ आखड्यांचे प्रमुख संत–महंत आणि त्यांच्या असंख्य शिष्यगणांनी, साधुंनी त्रिवेणी संगमावर अमृत स्नान केलं. सर्वप्रथम स्नान करण्याचा मान महानिर्वाणी पंचायतनी आखाड्याला मिळाला, तर शेटवचं शाही स्नान पंचायतनी निर्मल आखाड्याने केलं. आज सुमारे साडे तीन कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याचं वृत्त आहे.

****

कुंभ मेळ्यासाठी देवगिरी प्रांतातून सुमारे शंभर साधू रवाना झाल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष संजय बारगजे यांनी दिली. कुंभ मेळ्याबाबत दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते –

> ***सगळ्या जातीचे, सगळ्या संप्रदायाचे सर्व लोक एकत्र येऊन एका ठिकाणी स्नान करणं, याच्यासारखी जगात मोठी समरसता कुठेच नाही. सगळे भारतातील संप्रदाय त्या तिथे स्नानाला येतात. आपल्या देवगिरी प्रांतातून विविध संप्रदायाचे शंभर साधू यावेळी जाणार आहेत. आपण देवगिरी प्रांतातर्फे भगवे वस्त्र दोन हजार साधुंना तिथे प्रदान करणार आहोत.***

बारगजे यांची ही मुलाखत उद्या सकाळी दहा वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या प्रासंगिक कार्यक्रमात आपण ऐकू शकता

****

नाशिकमध्ये संक्रांतीनिमित्त नाशिकला रामकुंड इथं स्नानासाठी भाविकांनी गर्दी केली. त्याचबरोबर मंदिरांमध्ये देखील गर्दी झाली आहे. सर्वच मंदिरांवर आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

दरम्यान, शिकमध्ये पतंग उडवत असतांना एका बावीस वर्षीय मुलाचा नायलॉनच्या मांज्याने गळा कापला गेल्याने मृत्यू झाला. नाशिक पोलीसांनी नायलॉन मांजाच्या विरोधात कडक भूमिका घेतली असून काल एका दिवसात २४ गुन्हे दाखल करण्यात आले.

****

सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस आज साजरा केला जात आहे, यानिमित्त नागपूर इथं वायुसेना नगर इथल्या मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. सैनिकांचं सेवा कार्य आपण कधीच विसरू शकत नाही, त्यांच्यामुळेच या देशाचा गौरवशाली इतिहास, परंपरा आणि आपण सुरक्षित असल्याची भावना गडकरी यांनी व्यक्त केली.

****

लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी नवव्या सशस्त्र माजी सैनिक दिनानिमित्त पुण्यात एका कार्यक्रमाला संबोधित केलं. देशात सव्वा कोटी माजी सैनिक, सैनिक आणि त्यांचा परिवार आहे. या मनुष्य बळाचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी करता येऊ शकतो असं प्रतिपादन द्विवेदी यांनी केलं. यावेळी वीर पत्नी तसंच वीर सैनिकांच्या पालकांचा, द्विवेदी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****

राष्ट्रीय चाचणी संस्था - एनटीएनं उद्या १५ जानेवारीला नियोजित युजीसी नेट परीक्षा पुढे ढकलली आहे. पोंगल, मकरसंक्रांत आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर ही परीक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करण्यात येत होती, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं एनटीएनं निवेदनाद्वारे कळवलं आहे.

****

राज्यातील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व कंपन्यांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचं, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं आहे. यासंदर्भात आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सुरक्षा, कार पुलींग, परवाना, वाहतुक समस्या यासंदर्भातील पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देश सरनाईक यांनी दिले. राज्यात अनेक बसस्थानके ‘बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा’, या तत्वावर विकसित करण्यात येत आहेत. एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ तर मुंबईतील बोरिवली इथं १०० खाटांचं रूग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रूग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार आज विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. नामांतराचा लढा ही भारतात शिक्षणासाठी झालेली पहिली सामाजिक परिवर्तनाची चळवळ असून, बाबासाहेब हेच या चळवळीचे प्रेरणास्रोत असल्याचं प्रतिपादन नाशिकच्या डॉ बी आर आंबेडकर एस सी, एसटी महासंघाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. इंदिरा आठवले यांनी केलं आहे. ‘नामविस्तारानंतरची आव्हाने’ या विषयावर आज विद्यापीठातल्या विशेष व्याख्यानात डॉ. आठवले बोलत होत्या. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, बाबासाहेबांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी नैतिकता आणि व्यावसायिक मूल्यांचं जतन करण्याचं आवाहन केलं.

****

दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज विद्यापीठ परिसरात बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. आठवले यांनी, जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेत, या आंदोलनात आपल्या पाठिशी असलेल्या मराठवाड्याच्या हितासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचं सांगितलं.

धाराशिव इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपपरिसरात नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

नामविस्तार दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त वाशिम इथं विविध सामाजिक संघटना, पक्ष यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ऐतिहासिक पाणचक्की आणि दरवाजांचे चित्र असलेल्या टपाल तिकीटांचं आज खासदार भागवत कराड यांच्या हस्ते प्रकाशन झालं. शहरातील महात्मा गांधी मिशनमध्ये डाग विभागाचा महापेक्स २०२५ कार्यक्रम संपन्न झाला. पारपत्राची सुविधा शहरातल्या टपाल कार्यालयाद्वारे देण्यात यावी अशी अपेक्षाही कराड यांनी या प्रसंगी व्यक्त केली. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. अक्षय शेळके आणि गोविंद माने हे दोन टपाल विभागाचे कर्मचारी 'डाक सेवा जनसेवा' या संकल्पनेद्वारे ई सायकलवर विविध शहरांमध्ये प्रवास करून मुंबईला पोहोचणार आहेत. या ई सायकल रॅली ला हिरवा झेंडा कराड यांच्या हस्ते दाखवण्यात आला.

****

अवादा एनर्जी या कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराड यांना केज न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

****